||ॐ||

|| निज भक्त रक्षणा सिध्द रहाणे । हा तर माझा धर्म असे ||
|| अनादि सिध्दनी तत्त्वाची शाश्वत । अवताराचे वर्म असे ||

श्रीनृसिंहसरस्वती

जन्मतांचि मुखे ॐकार करी पाहूनि ते नर नारी।
त्रैमूर्ती अवतार प्रकटला म्हणूनि त्या नमस्कारी।।

दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा



दिगंबरा दिगंबरा श्रीपादवल्लभ दिगंबरा

# || भक्ति-भावे नमितो ||

दत्त माझा गुरु । दत्त भव तारु ||
दत्त चि आधारु । मज एक ||


रचयिता

स्वरुपसुत श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य यती स्वामी गोकुलेंद्र सरस्वती

# समर्पण

## सोऽहं

## स्वामी स्वरुपानंद



कोंकण प्रांती पावस ग्रामी माझा स्वरुपानंद ।
भक्ति-भावें अर्पिता पदीं होतो बहु आनंद ।।

ही अल्पशी कृती
स्वामी स्वरुपानंद
यांच्या चरणी सर्वभावे समर्पण...

स्वरुपसुत श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य यती स्वामी गोकुलेंद्र सरस्वती

॥ ॐ ॥

# ॥ भक्ति-भावे नमितो ॥

## श्री गुरुलीलामृत

रचयिता : स्वरुपसुत –प.प.स्वामी गोकुलेंद्र सरस्वती

**प्रसाद भेट**

(फक्त खासगी वितरणाकरीता)

* प्रकाशन हक्क *

श्री. मंगेश (निलेश) प्रभाकर कर्णिक



# प.प.स्वामी गोकुलेंद्र सरस्वती यांचा जीवनौघ
## पूर्वाश्रमीचे नाव : श्री. सुधाकर मंगेश कर्णिक

मु.पो. करुळ, ता.कणकवली, जि. सिंधुदुर्ग

जन्म: १४ नोव्हेंबर १९४५ ✡ ब्रह्मलीन : २५ जुलै २०१७

- बालपण व प्राथमिक शिक्षण करुळ येथे. एम. एस. हायस्कूल कणकवली १९६४ साली एस.एस.सी उतीर्ण, १९६५ ते १९७५ पर्यंत सरकारी नोकरी. सरकारी नोकरी करत असताना डॉ. दातार महाविद्यालय चिपळूण मधून १९७४ साली बी. कॉम. उतीर्ण.
- १९७३ साली सदगुरूस्वामी स्वरूपानंद, पावस (रत्नागिरी) यांचेकडून नाथ संप्रदायाची दीक्षा.
- १९७५ सरकारी नोकरीचा राजीनामा व श्री क्षेत्र आळंदी देवाची येथे वास्तव्य.
- श्री क्षेत्र आळंदी देवाची स्वामी सत्यदेवानंद सरस्वती यांचेकडून २९ ऑगस्ट १९७५ (श्रीकृष्ण जन्माष्टमी) रोजी श्री हरिहरेंद्र स्वामी मठ, आळंदी येथे विधिवत संन्यास ग्रहण.
- १९७५ श्रावण वद्य द्वादशी रोजी प. प. स्वामी गोकुलेंद्र सरस्वती यांच्या हस्ते स्वामी स्वरुपानंद यांच्या प्रथम पुण्यदिनी समाधी शिलान्यास व समाधीस पुष्पहार वाहिला.
- श्री क्षेत्र पावस येथे असताना सदगुरू स्वामी स्वरूपानंद यांच्या स्वप्नदृष्टांताप्रमाणे संन्यास वस्त्रे उतरवून नोकरी करण्याची आज्ञा. त्याप्रमाणे गोवा (वास्को-द-गामा) येथे सन १९७९ ते १९९२ पर्यंत बांदेकर ग्रुप ऑफ कंपनीमध्ये नोकरी.
- १९९२ मध्ये नोकरीचा राजीनामा व स्वामी स्वरूपानंदांच्या आज्ञेप्रमाणे, करवीर निवासिनी जगन्माता व भगवान नृसिंह सरस्वती यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे पारमार्थिक साधना व अभ्यास.
- भगवान दत्तात्रेय यांच्या मार्गदर्शनाखाली सोऽहं साधना व ग्रंथलेखन.
- श्री ज्ञानेश्वरी मुळ ग्रंथाचे हस्तलिखित करून सटीप पोथी तयार केली. (१९९९)
- श्री गुरूचरित्र ह्या ग्रंथाचे हस्तलिखित करून हस्तलिखित पोथी तयार केली. (२००४)
- भक्ती-भावे-नमितो हे गुरूचरित्रावरील साकी वृत्तातील संक्षिप्त सार स्तोत्र. (२००६)
- श्रीकृष्ण लहरी :- प. प. वासुदेवानंद सरस्वती (टेंबे) स्वामी यांच्या मूळ संस्कृत ग्रंथाचा साकी वृत्तात मराठी अनुवाद. (जाने. २००७)
- श्री संत स्वामी स्वरूपानंद पावस (रत्नागिरी) यांचे पद्यमय साकी वृत्तातील चरित्र व सोऽहं साधना हा ग्रंथ (२००७)
- श्रीमद्भगवतद्गीता अभंगात्मक प्राकृत अनुभव श्रीमत् अभंग-गीता (२००९)
- सन २००७ मध्ये स्वामी स्वरूपानंद पावस (रत्नागिरी) यांच्याकडून सोऽहं अनुग्रह देण्याचा म्हणजे संप्रदाय चालविण्याचा स्वप्नदृष्टांत देऊन अधिकार दिला.
- १/९/२०१० रोजी स्वामी स्वरूपानंद, भगवान नृसिंह सरस्वती, जगन्माता करवीर निवासिनी महालक्ष्मी यांच्या आज्ञेप्रमाणे उतरलेले संन्यास वस्त्र पुन्हा ग्रहण केले.
- दि. २८/४/२०११ रोजी भगवान नृसिंह सरस्वती स्वामी महाराज यांच्याकडून दंड ग्रहण.

## ।। मनोगत ।।

## प. प. स्वामी गोकुलेंद्र सरस्वती भक्त परिवार

पुण्यपद गुरू प.प.स्वामी गोकुलेंद्र माउली ।
धन्य जाहलो या जगती गुरुकृपा लाभली ।।१।।

"भक्ति-भावे-नमितो" झाली रचना सुंदर ।
लिहिते झाले यती स्वामी गोकुलेंद्र ।।२।।

बहु आनंद जाहला पंचम आवृत्ती सादर करण्या ।
गुरू प्रसाद म्हणुनी सप्रेम छपाई भक्त रक्षिण्या ।।३।।

स्तुती करण्या गुरुपदांची शब्द तोकडे पडती ।
पठण करिता गुरुलीलामृत सहज तरुनी जाती ।।४।।

भक्ताच्या हाकेस्तव तत्पर सदैव असती सद्गुरूदत्त
नित्य प्रभुंच्या स्मरणास्तव सिध्द भक्ति भावे नमितो हा ग्रंथ ।।५।।

नित्य पठण-परायण करिता अनुभव येतसे भक्तां
मनोकामना पूर्ण करितसे-हो संकटातूनी मुक्तता ।।६।।

सर्व मंगल सुमंगल राहण्या भजत रहा गुरुदत्त
सर्वांचे कल्याण व्हावे गुरूपदी प्रार्थना ही नित्य ।।७।।

निमित्त मिळता गुरू स्तुतीचे बहु आनंदून जावू ।
ध्येय जीवा ना दुसरे कसले गुरू गौरवात न्हावू ।।८।।

## गुरुचरित्रामृत द्यावे घ्यावे एक । ते चि प्रास्ताविक मनोगत ।।

श्रीगुरुचरित्र ग्रंथ अलौकिक वेद प्रणित ते मंत्र ।
महाप्रासादिक वरदानी असुनी सिध्द ग्रंथ ते पवित्र ।।१।।
दत्तसांप्रदायिकां मध्ये हे प्राणपरौते असते ।
नित्य प्रतिदिनी पठण चालते तसे सप्त-दिनी ते ।।२।।
उपासनेच्या माध्यमांतूनि लक्षावधि सेविती ।
संकट नाशन मनःकामना त्वरित पूर्ण त्या होती ।।३।।
लक्षावधि ते अनुभव घेती आज ही सांप्रत कालीं ।
वैयक्तिक ते म्हणुनि कोणी ना तशी वाच्यता केली ।।४।।
जरि अनुभव ते महत् प्रयासे संकलित ही होती ।
तरी हजारो गुरुचरित्रें आज ही निर्मित होती ।।५।।
लीला-लाघव श्रीगुरु स्वयें भक्तोध्दारासाठी ।
लीले मधुनी आचार दाविती विहित-कर्म शिकविती ।।६।।
चारी वर्णां धर्मोपदेश अन् ज्ञानोपासना वदती ।
वर्ण-विशेषे कर्म-वि-कर्म अन् अ-कर्म ते दाखविती ।।७।।
अनुभव पोटी साठवुनि असे गुरु-सेवा-व्रत चाले ।
त्यातूनि भक्ति-भावे-नमितो चरित्रामृत आले ।।८।।
चरित्रामृत सेविता लाभते सार्थकता ग्रंथाची ।
स्त्री-पुरुष-आबाल-वृध्द त्या कृतार्थता जन्माची ।।९।।
भक्ति-भावे नित्य सेविता धर्मार्थ लाभ हो काम ।
विना प्रयासे ज्ञानबोध अन् कैवल्याचे धाम ।।१०।।
औदुंबर तळवटी राहतो नृसिंह सरस्वती योगी ।
कृष्णा-पंचगंगा संगमि परम शांति सुख भोगी ।।११।।
ध्यानस्त राहूनि नित्य निरंतर समस्त चरित्र पाहे ।
अनन्य शरण जाहला तयाला इच्छित ते देताहे ।।१२।।
श्रीगुरुस्तव वदतां वाचे बोल बोबडे होत ।
गुरुचरणि अतां ठेवुनि माथा रहावे चि निवांत ।।१३।।

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
२०.०२.२००६

# ।। स्वामी स्वरुपानंद वंदन ।।

नमितो परब्रह्म श्री स्वामिन् महान संत महात्मा ।
आदिनाथ सिध्द पुरुष तो स्वरुपानंद परमात्मा ।।१।।

चित्ती स्मरता वाचे वदता स्वामी स्वरुपानंद ।
आनंदाच्या उसळति लाटा होई परमानंद ।।२।।

परम दयाळा परम कृपाळा परम शांत स्नेहाळा ।
प्रियंवद कुली अवतरे पावसी कैवल्याचा पुतळा ।।३।।

अहंकार सांडुनी धरावे पावन श्रीगुरु चरण ।
श्रीगुरु वरुनी टाकावी की काया कुरवंडून ।।४।।

नयन मनोहर स्वरुप सुंदर वारंवार पहावे ।
श्रीगुरु नामी नित्य अंतरी निशि-दिनी रंगुनि जावे ।।५।।

जसे अलंकापूर तसे ते पावस भू-वैकुंठ ।
सोऽहं भाव नांदतो तिथे स्वरुप शांती दूत ।।६।।

स्वरुपानंदा नमिता झाला प्रसन्न नारायण ।
प्रसन्न होता प्रसन्न चित्ता प्रसन्नता संपूर्ण ।।७।।

करवीर-कोल्हापूर
१९.१०.२००४

# ।। नमन तुला गुरुवरा ।।

भव-सागर हा तारुनि मजला न्यावे जी पैलतीरा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।१।।

कामक्रोधादिक हे सगळे परी न लागो वारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।२।।

गुरु चि माझा देव एकला अन्य नको मनी थारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।३।।

गुरु सेवेविण न जावो क्षण नको चि धन-सुत-दारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।४।।

गुरु नामाचा अखंड खेळो नसांनसांतुनि वारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।५।।

सोऽहं संगीत हृदय मंदिरी घुमवा छेडुनि तारा।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।६।।

देह -भाव हा समूळ जावो उगवो सोऽहं तारा।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।७।।

निवाऱ्यातला दीप तेवतो तैसे मन स्थिर करा।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।८।।

कुंडलिनी जगदंबा जावो भेदुनि साही चक्रा।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।९।।

पुनरपि जननं पुनरपि मरणं नको जिवासी फेरा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।१०।।

बह्म सत्यं जगन्मिथ्या अनुभव द्यावा न्यारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।११।।

मन-पवन जये संतत लाभो चिदाकाशी निवारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।१२।।

जिवा शिवाची भेट होऊ दे खेळ संपवा सारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।१३।।

ऋध्दि सिध्दि आणि प्रसिध्दि नको चि यांना थारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।१४।।

स्वरुपसुत हा विनवि श्रीपती स्वरूप सुंदर धारा ।
दोन्ही कर जोडुनि करितो नमन तुला गुरुवरा ।।१४।।

************

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
२०.०२.२००६

# ।। भक्ति-भावे नमितो ।।

(श्रीगुरुलीलामृत)

त्रैमूर्ती अवतार मनोहर नरहरि-नारायण तो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१।

गोड नाम ते स्मरता चि मनीं भक्तवत्सल येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२।।

चारि युगांचा असे नियंता युगपरत्वे येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३।।

सृजी पाळी आणि संहरी पुन्हा वेगळा असतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।४।।

अमृत अब्धि दोन अक्षरे गुरु चि आपण असतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५।।

ज्ञान तारवी बसवुनि भक्ता भव-पार नदी करतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।६।।

कार्यकारण अवतार घेऊनि भूमिभार फेडतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।७।।

अंबऋषी कारणे भूमिवर स्वये चि आपण येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।८।।

दशावतारी पूर्णब्रह्म परि स्थूळ-सूक्ष्मी जो वसतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।९।।

अनसूयेचे सत्व पाहता बाळ होउनी रमतो।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१०।।

ब्रह्मा विष्णू रुद्र त्रिमूर्ती स्वये चि आपण असतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।११।।

भिक्षुकापरी ब्राह्मणा घरी पीठापुरी जो येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१२।।

नमस्कारिता पतिव्रतेते जननी म्हणुनी वदतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१३।।

तिच्याच पोटी जन्म घेऊनि श्रीपाद म्हणुनी येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१४।।

अंध पांगळा बंधु देखता सगुण तयांसी करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१५।।

तीर्थे पावन करित भूवरी गोकर्णासी येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१६।।

कल्माषपाद उध्दारास्तव गौतमऋषी होतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१७।।

गोकर्णासी कैलासपती म्हणुनी वास जो करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१८।।

रजकाचा राजा करुनी यवनि राज्य जो देतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।१९।।

करुनिया त्वरा वधुनि तस्करा भक्तासी रक्षितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२०।।

करंज नगरी प्रकटुनी हरी ॐकार मुखे करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२१।।

मुका म्हणविता मुंजी बांधिता चारि वेद जो म्हणतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२२।।

हस्त मस्तकी ठेवुनि जननी पूर्व जन्म दाखवितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२३।।

श्रीपाद श्रीवल्लभ नरहरि स्वये चि म्हणतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२४।।

पुत्र युग्म ते देऊनि जननी काशी क्षेत्री जातो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२५।।

जनक जननी स्मरता चि मनी सन्मुख तया येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२६।।

कृष्ण सरस्वति गुरु करुनिया संन्यासाश्रम घेतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२७।।

अन्न चि औषध देऊनि विप्रा उदर व्यथा दवडिमो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२८।।

यवनाचे भय दवडुनि सायंदेवा अभय चि देतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।२९।।

तीर्थे भूवरी सांगूनि शिष्या आपण गुप्त रहातो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३०।।

गुरु संतोषी ज्ञान भरंवसी पटवूनि मुनिसी देतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३१।।

भुवनेश्वरी सन्निध यतिवर गुप्तपणाने असतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३२।।

ज्ञान जिव्हा हीन ब्राह्मणा बघता पावन करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३३।।

विप्र मंदिरी वेल उपटुनि हेम-कुंभ जो देतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३४।।

कृष्णा पंचगंगा संगमि नित्य वास जो करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३५।।

चौसष्ट योगिनीकडे जाउनी प्रतिदिनी भिक्षा करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३६।।

गंगानुज जो वृत्ति राखतो त्यास सहज उध्दरितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३७।।

वाडी ग्रामी प्रातःस्नान अन् अनुष्ठान जो करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३८।।

अनुष्ठान सारुनि माध्यान्हि गाणगापुरी जातो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।३९।।

अन्नपूर्णा पादुका मनोहर औदुंबरि ठेवितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥४०॥

विप्रस्त्रियेचा समंध दवडूनि जिवंत पुत्रा करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥४१॥

अमरजा संगमी स्नान-ध्यान मग मठी निर्गुणी येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥४२॥

वांझ महिषी भिक्षे दुभवुनि विप्रस्त्री सुखवितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥४३॥

नगराधिपती विनविता यती सवे चि ग्रामे येतो।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥४४॥

ग्रामी येता ब्रह्मराक्षसा क्षणीच जो उध्दरितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥४५॥

दांभिक म्हणता त्रिविक्रमासी विश्वरुप दाखवितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥४६॥

वेद वल्गना गर्व ब्राह्मणा म्हणुनी शिक्षा करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥४७॥

वेद -पतिता मुखी म्हणवितो भस्म माहात्म्य हि कथितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।४८।।

सति-पति येता पति चि मरता सुधा-दृष्टि उठवितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।४९।।

स्त्री आचार धर्म सांगूनि ज्ञान-बोध जो करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५०।।

वार वनिता परि पतिव्रता अग्नि प्रवेशी धरितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५१।।

महिमा रुद्राध्याय सांगूनि आयुःवृध्दी जो करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५२।।

पति-भक्ति हा मंत्र सांगुनी स्त्रियांसि जो उध्दरितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५३।।

परान्न भोजन दोष ब्राह्मणा कर्म मार्ग दाखवतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५४।।

अल्प अन्न सामुग्री असता सहस्त्राधिक जेववितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५५।।

साठ वर्ष उलटुनि जाता कन्या पुत्र जो देतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५६।।

तुळजापुरचा कुष्ठी ब्राह्मण बघता पावन करितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५७।।

शुष्क-काष्ठा पल्लव आणुनि विप्रकुष्ठ दवडितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५८।।

सायंदेवा सांगुनि सेवा काशियात्रा घडवितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।५९।।

अनंत व्रत सांगुनी पांडवा राज्य मिळवुनी देतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।६०।।

तंतुकाचा दृढ-भाव पाहूनि श्रीशैल्याशी नेतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।६१।।

दिवाळी दिनी येतो म्हणूनि भक्ता आश्वासितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।६२।।

अष्ट रुपे होउनी स्वये भक्त घरी मठी असतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।६३ ।।

शेत कापूनि शुद्र दाखवी सहस्त्राधिक पिकवितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥६४॥

रत्नाबाई बाहिण धाकुटी कुष्ठ तिचे दवडितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥६५॥

राजा म्हणुनी रजक येऊनि राज्य पहा विनवितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥६६॥

अवलोकुनिया राज्य म्हणतसे श्रीशैल्यासी भेटो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥६७॥

अवतार कार्य पूर्ण जाहले कर्दळीवनी जातो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥६८॥

विघ्नेश्वर स्थापुनी पादुका मठी निर्गुणी येतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥६९॥

पुष्पासनास्थित पायी पादुका दंड-कमंडलु धरितो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥७०॥

कर्दळीवनी जाता चि खुणे प्रसाद पुष्पे देतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ॥७१॥

श्रीगुरु आज्ञा प्रमाण प्रज्ञा चरित्र गुरुचे गातो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।७२।।

ऐश्वर्य-सुख-शांती-आयुःसमाधान जो देतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।७३।।

नित्य वाचिता लिहिता हाता स्वरुपसुत ही रमतो ।
नृसिंहसरस्वती दत्तात्रेया भक्ति-भावे नमितो ।।७४।।

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
२२.०६.२००३



# ।। आरती श्रीगुरुचरित्राची ।।

( चाल – त्रिगुणात्मक त्रैमुर्ती दत्त हा जाणा...)

जय जय ग्रंथराज परम पावन ।
भक्ति-भावे करितो तुज निरांजन ।।धृ।।

पांचवरी तीन अध्याय त्रेपन्न ।
श्रीगुरुचरित्र ग्रंथ महान ।।

कळी-काळाचे भक्ता न लगे भेण ।
भूत- पिशाचादि जाती पळून ।।२।।

संकल्प विकल्प दूर करून ।
भक्ताचे स्वरूपीं करि स्थिर मन ।।३।।

प्रत्यक्ष चि ग्रंथ श्रीदत्त जाण ।
नित्य हाती धरिता दे आत्मज्ञान ।।४।।

लिहिता-वाचिता तैसे पर-अयन ।
जिंके कळी-काळा भक्ता वरदान ।।५।।

काया-वाचा-मन ग्रंथी लावून ।
स्वरुपसुत होय आनंदि मग्न ।।६।।

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
२२.०६.२००३

# ।। आरती श्रीदत्ताची ।।

आरती ओवाळू, गुरुराया ।
नरहरी दत्तात्रेया, आरती ओवाळू ।।धृ।।

स्वरूपें सुंदर, त्रयमूर्ति ।
हरि - हर - प्रजापती ।
सत्व पाहती, कैसी सती ।
अनसूया सदनी येती।।१।।

सत्व पहातां, पतिव्रता ।
स्मरता अत्री-नाथा।
वस्त्रें फेडिता, वाढिता ।
झाली बाळें त्वरिता।।२।।

अत्री-मुनि येता, पाहाता ।
तिन्ही देवां नमिता ।
धन्य स्तन्य देता, पतिव्रता ।
हो त्रयमूर्ति माता ।।३।।

नरहरी नारायणा, कृपावंता ।
भव-सागरी या बुडता ।
धरूनि मज हातां, दीनार्ता ।
उध्दरी स्वरूपसुता ।।५।।

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
२५.०२.२००६

************

जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।श्री।।
जय देव जय देव

करूळ ग्रामी जन्मले बालक गुणवान । कर्णिक कुळ उध्दरिले सर्व सुखा त्यागुन ।।
जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।गो।।

सोज्वळ मुख प्रभा शांत तेजस्वी । जगदंबेची त्यावरी कृपा ओजस्वी ।।
जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।कु।।

कृष्णेकाठी केले घोर तपस्या जाण । दत्तात्रयांची लाभली छत्रछाया महान ।।
जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।लें।।

अष्टमीला घेतलासे अवतार गोकुलेंद्र । वाडी ग्रामी वसविले गोकुळ सुंदर ।।
जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।द्र।।

कलीयुगी अवतरलासे दत्ताचा दूत । स्वरूपानंद प्रेमे म्हणती स्वरूपसुत ।।
जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।स।।

नाथ सांप्रदाय असे सनातन । साक्ष देण्या केले जन उध्दरण ।।
जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।र।।

लावियला लळा केले पतिता पावन । गोकुलेंद्र चरणी रमले भक्त हो धन्य ।।
जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।स्व।

सोऽम सोऽम दिले परा साधन । उमा आनंदली करण्या तुझे भजन ।।
जय देव जय देव जय गोकुलेंद्र कृष्णा । दावुनि लिला तोषवी भक्तांची तृष्णा ।।ती।।

# भगवान दत्तात्रेय श्री नृसिंह सरस्वती पाळणा

माधव नंदना नंदना नरहरी नारायणा ।
बाळा जो जो रे ।।धृ।।
अंबा भवानी देव जननी धन्य हो प्रसवूनि ।
दत्ता नरहरी करंज नगरी आला अवनीवरी ।।१।।
बाळ जन्मता ओंकार करी म्हणती नर नारी ।
पुरूष अवतारी उध्दरी साधु-संत-जना ।।२।।
अंबा माधव उभयता करूनी प्रदोषव्रता ।
केला अवतार विश्वनाथा चरणी ठेवी माथा ।।३।।
बाळ बोलेना मुका म्हणवी  करूनी खुणा दावी ।
मौजी बंधना भिक्षा करी बोले वेद चारी ।।४।।
बाळ चालला काशीला श्रीपाद श्रीयती ।
तेथे प्रकटला म्हणे माये नरहरी मीची स्वये ।।५।।
हस्त मस्तकी ठेविता पूर्व जन्म स्मरता ।
वदे पुत्रची हा म्हणूनि तया वंदितसे अति विनया ।।६।।
काशीपुरी जाता विश्वनाथा वंदुनि दीक्षा घेता ।
कृष्ण सरस्वती नांव देती नृसिंहसरस्वती ।।७।।
होती विप्रासी उदरव्यथा अन्नची औषध देसी ।
भक्त वांच्छित पुरवसी नाना रूपे घेसी ।।८।।
जिव्हा छेदून ज्ञानहीन आला ब्राह्मण त्यासी ।
ज्ञान देऊन पाठविसी जिव्हा ही लावून ।।९।।
विप्र स्त्रियेचा समंध दवडूनि अभय देसी ।
जिवंत करिसी मृतपुत्र कृष्णाकाठी सत्य ।।१०।।

भिक्षा विप्र घरी अमरेश्वरी घेऊनि जाता दारी ।
वेल घेवड्याचा उपटिसी हेम-कुंभ त्या देसी ।।११।।
वांझ महीषी दुभविसी विप्रस्त्रि सुखविसी ।
भिक्षा करिसी तिजपासी जाशी संगमासी ।।१२।।
वार्ता पसरली ग्रामात ग्रामाधिपती येत ।
विनवी यतिराया यावे जी उध्दरी या दीनासी ।।१३।।
यति त्रिविक्रम भारतीसी विश्वरूप दाखविसी ।
करिसी उध्दार गुरूराया नरहरी दत्तात्रेया ।।१४।।
साठ वर्षाची म्हातारी कन्या पुत्र देसी ।
राज्य रजकाला तोषोनी यवनी राजा करिसी ।।१५।।
तंतुक विणकरी श्री शैल्या अवकाशातूनी नेसी ।
महिमा स्थानाचा दाखविसी तेथे तूं चि अससी ।।१६।।
विप्र श्वेतांगी दृष्टिक्षेपे उत्तमांगी करिसी।
पल्लव आणियले शुष्क काष्ठा दवडी विप्रकुष्ठा।।१७।।
शेत कापूनि वाट पाही कधी येई गुरूदेव ।
शुद्रा पिकवले अपरिमित पाहूनि दृढ भाव ।।१८।।
माहूरगडचा रोगीपती घेऊनि येई सती ।
प्राण जाताची अमृत दृष्टी प्रेतासी उठविसी ।।१९।।
ब्राह्मण आचार विप्रासी दाखवूनि त्या देसी ।
मंत्र पतिभक्ती सांगसी स्त्रियासी उध्दरसी ।।२०।।
तुझ्या वास्तव्ये पुनीत अनुपम तीर्थ क्षेत्र ।
वाडी नृसिंह म्हणुनी झाले जगद्‌विख्यात ।।२१।।
भक्त वत्सला दयाळा करूणेच्या सागरा ।
स्वरूपसुत विनवी तंव पाया भव-सागर तराया ।।२२।।

२१.०७.२००३

# प.प.श्री वासुदेवानन्द सरस्वती (टेंबे) स्वामी महाराजाचा पाळणा

जो जो जो जो रे गुरूराया वासुदेव दत्तात्रेया ।।धृ।।
रमा-गणेश जनक-जननी धन्य हो त्रि-भुवनी।
बाळा वासुदेवा प्रसवूनि दत्त-देव वरदानी ।।१।।
वद्य श्रावण पंचमी साधुनि माणग्रामीं ।
प्रकटे परमात्मा अवनी पावन कोकण भूमि ।।२।।
बाल्यापासूनि यौवनी रमला शास्त्राध्ययनीं।
सोऽहं साधनी उन्मनी संतत अनुसंधानी ।।३।।
नित्य वंदीसी जननीसी मातृदेवो वदसी।
जना शिकविसी त्या चि रीति नतमस्तक तुज होती ।।४।।
श्रुति-स्मृतीतें प्रमाण मानिसी तूं यतिवर्या ।
लोक कल्याण इच्छून करिसी तूं दिनचर्या ।।५।।
रूप अरूपाचे स्वरूप निवारी भव-ताप ।
पाहता तुज देवा करी हेवा मोक्ष हो लज्जीत ।।६।।
विश्व-व्यापका विश्वात्मा परब्रह्म परमात्मा ।
आत्मा-अनात्मा एकात्मा वासुदेव सर्वात्मा ।।७।।
सच्चित् सुखधामा विश्रामा भक्त जनांच्या कामा ।
येती गुणीजन दर्शना माणग्रामी धामा ।।८।।
दासांचा दास जाहला भक्तीसाठी विकला ।
स्वामी विश्वाचा निशी-दिनी श्रमतो भक्तांसाठी ।।९।।
स्वरूप सुत विनवी सद्भावें वासुदेव गुरूनाथा ।
देई पदि ठाव मज आतां त्रैमूर्ती गुरूदत्ता ।।१०।।

०४.०९.२००६

## ।। पाळणा स्वामी स्वरूपानंदाचा ।।

विष्णु नंदना रामचंद्रा स्वामी स्वरूपानंदा ।
बाळा जो जो रे ।।धृ।।
राम जन्मला पावसी रखुमाईच्या कुशी ।
प्रियंवद वंशी मार्गशीर्षि कृष्ण व्दादशीसी ।।१।।
पिता विष्णुपंत सुशील शांत करी अहोरात्र ।
विष्णु सहस्त्र नामाचे पाठावरती पाठ ।।२।।
गंगा पितामही वाडीत केले तप बहुत ।
त्याचे फलित पावसेत अंशरूपे दत्त ।।३।।
बाल वयात आवडे देवळाची वाट ।
वाटे पाहूनि कोण्या रूपा आला जगी संत ।।४।।
कथा कीर्तने ऐकसी ऐकता चि ती पाठ ।
येता घरासी नक्कल करिसी लागे हसूनि वाट ।।५।।
माडावर चढसी पोहसी शर्यतीत तूं पळसी ।
खेळ खेळसी तयामध्ये सूत्रधार तूं असससी ।।६।।
अश्विन नवरात्री खेळसी झिम्मा आणि फुगडी ।
घागर फुंकिसी काढिसी लटिके कुंकू देसी ।।७।।
पुण्य पत्तनी गणेशनाथ दाखवी सोऽहं पथ ।
हस्त मस्तकी ठेविता गेले देहभान ।।८।।
बाल्यापासूनी यौवनी रमला गीताध्ययनी ।
सोऽहं साधनी उन्मनी संतत अनुसंधानी ।।९।।
मातृ-भूमीच्या स्वातंत्र्या करिसी तू संग्राम ।
शस्त्र न धरिसी परी लढसी संतत अविश्राम ।।१०।।
स्वावलंबन आश्रमी छात्रा तूं शिकविसी ।
वाटे पावस कीर्ती वाढो एक चि ध्यास चित्ती ।।११।।

सहा महिने अंथरूणी लौकिकसा आजार ।
परि अंतरी सोऽहं ध्यान झाला साक्षात्कार ।।१३।।
जगन्माऊली लावितसे आत्मस्मृतीची तीट ।
भक्ति सुखाचा भरवितसे साखर घास अविट ।।१४।।
मृत्यूचा मृत्यू पाहसी कृतार्थ जीवन करिसी ।
जाई सोडूनि संसार अभयत्व ये तुजसी ।।१५।।
शंख चक्र गदा पद्म करी रूप उभे तव दारी ।
कोण गोड बोले पाहिन मी लिहिली ज्ञानेश्वरी ।।१६।।
रूप चतुर्भुज सावळे सुंदर ते सुकुमार ।
घेसी सगुण दर्शन झालासी ईश्वर ।।१७।।
आर्त जिज्ञासु तैसे भक्त येताती पावसी ।
सोऽहं साधन दाखविसी परमार्था लाविसी ।।१८।।
ज्ञानदेवांचा अवतार केला जगी उपकार ।
अभंगी अनुवाद ग्रंथाचा गहन बोध सुबोध ।।१९।।
सव्वीस गुण रूपी मुक्तिबाला घेऊनि वर-माला ।
येई शोधित वर बरवा साधुनि लग्नवेला ।।२०।।
दया क्षमा शांति नांदती चित्ती करूणा बाळा ।
शब्द अधिक उणा येईना अहिंसेचा पुतळा ।।२१।।
सरळ नासिका विशाल भाल सुलोचन हास्य ओठी ।
बंडी धोतर कानटोपी गौर कृशतनुयष्टी ।।२२।।
साधु संत यति संन्यासी नित्य जन येत ।
तुझ्या दर्शने पावन पावस भू-वैकुंठ ।।२३।।
स्वरूप सुत विनवी गुरूनाथा सांभाळी या जगता ।
ठेवी पदी माथा सुखदाता सुखवी भक्त-अभक्ता ।।२४।।

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
२९.०७.२००३

## ।। अपराध-क्षमा आता करा गुरुवरा ।।

अपराध-क्षमा आता करा गुरुवरा
स्वामी करा गुरुवरा ।
चरण शरण हा किंकर आला स्वामी तंव द्वारा
आला स्वामी तंव द्वारा ।।धृ।।

काया-वाचा-मनादि पापें घडली आजवरा
गुरुवरा घडली आजवरा ।
कृपा करा जरा गुरुवरा तारा या पामरा
गुरुवरा तारा या पामरा ।।१।।


सद्बुध्दि सद्वासना द्यावी मजसी गुरुवरा
द्यावी मजसी गुरुवरा ।
कृपा सागरा धरा मज करा श्रमलो या संसारा
गुरुवरा श्रमलो या संसारा।।२।।


नाही भक्ति ज्ञान विरक्ती घडली गुरुवरा
नाही घडली गुरुवरा ।
नाही स्मरलो कधी गुरुवरा चित्तीं अवधारा
गुरुवरा चित्तीं अवधारा ।।३।।

ज्ञानार्काचा उदय करा हो गुरुवरा दातारा
स्वामी गुरुवरा दातारा ।
कैवल्य-घरा नेई गुरुवरा भव-सागरी तारा
गुरुवरा भव-सागरी तारा ।।४।।

स्वरुपसुत हा विनवी गुरुवरा स्वरूप सुंदरा
स्वामी स्वरूप सुंदरा ।
पाप-ताप-हरा गुरुवरा देई पदी थारा
गुरुवरा देई पदी थारा ।।५।।

श्रीक्षेत्र नृसिंहवाडी
७-९-२००३







स्वरुपसुत श्रीमत् परमहंस परिव्राजकाचार्य यती स्वामी गोकुलेंद्र सरस्वती